# अटल बांबू समृद्धी योजना

धनश्री निगडे
आचार्य पदवी विद्यार्थिनी

अनिल आडे
आचार्य पदवी विद्यार्थी

विस्तार शिक्षण विभाग
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

बांबू ही एक बहुपयोगी, आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे, जलद वाढणारी, सदाहरीत, मानवाच्या लाकूड विषयक गरजा पूर्ण करण्याकरिता सहज उपलब्ध होणारी व दिर्घायु प्रजाती आहे. देशात बांबूची बाजारपेठ सुमारे रु.२६,००० कोटीची असून त्यामध्ये बांबू फर्निचर, बांबू पल्प, बांबू मॅट बोर्ड, कार्टेज इंडस्ट्रीज, प्लाय बोर्ड इत्यादी समाविष्ठ आहे. बांबूमध्ये जास्त गतीने कार्बन शोषण करुन ग्लोबल वार्मिंगलाही मात देण्याची अमर्यादित क्षमता आहे. बांबू लागवडीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांचे जीवनमान उंचविण्यास मदत होणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय बांबू मिशनची स्थापना केलेली आहे.

### शासन निर्णय:

शेतजमिनीवर तसेच शेताच्या बांधावर बांबू लागवडीकरिता शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी “अटल बांबू समृध्दी योजना” या नावाने नवीन योजना राबविण्यास शासनाची दिनांक २७ जून २०१९ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

### योजनेचे उद्दीष्ट:

- शेतकऱ्यांना टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करणे.
- शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाला जोड देण्यासाठी जमिनीवरील बांबू लागवडीखालील क्षेत्र वाढविणे.
- बांबू लागवडीमुळे शेतकऱ्यास उपजिवीकेचे साधन निर्माण करणे व शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत करणे.

### टिश्यू कल्चर बांबू रोपांची आवश्यकता:

- बांबूच्या वैशिष्ट्यानुसार बांबूस फुलोरा येण्याचे ठिकाण आणि कालावधी याची निश्चिती नसते. त्यामुळे या बीयांपासून होणारी प्रजाती ही व्यावसायिकरित्या तयार करणे शक्य होत नाही.
- बांबूचे जीवनचक्र हे ४० ते १०० वर्ष असल्यामुळे त्यांचे बियाणे वेळेवर उपलब्ध होत नाही.
- बांबू बीयांची उगवण क्षमता फक्त ३ ते ६ महिने असते. यामुळे बांबूला कलम तयार करुन बांबू रोपे तयार केली जातात.
- उत्तम बांबू रोपे आणि प्रजातीच्या शुद्धतेची गुणवत्ता टिकवून ठेवणे व मोठ्या प्रमाणात बांबू रोपांच्या निर्मितीसाठी टिश्यू कल्चर बांबू रोपे तयार करणे हा एक उत्तम पर्याय आहे.
- बाजारातील उपलब्ध इतर रोपवाटिकांमधून बांबू रोपे खरेदी करुन शेतात लावल्यानंतर त्या प्रजातीपासून ५ वर्षाच्या मेहनतीनंतर अपेक्षेप्रमाणे उत्पन्न मिळाले नाही तर शेतकऱ्यांचे खूप नुकसान होईल. त्यासाठी शुद्धता व ओळखीची प्रजाती उपलब्ध करुन देणे हे बांबू विकासाचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी टिश्यू कल्चर बांबू रोपे उपलब्ध करुन दिल्यास हा उद्देश पूर्ण होऊ शकतो.

### टिश्यू कल्चर बांबू रोपांकरिता प्रजाती:

महाराष्ट्रामध्ये मानवेल, कटांग या प्रजाती विदर्भ क्षेत्रात तर माणगा ही प्रजाती कोकण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आढळून येते.

### टिश्यू कल्चर बांबू रोपांचा दर:

टिश्यू कल्चर बांबू रोपांचा दर अंदाजे रु. २५ /- प्रती रोप आहे. शेतकरी बांबू रोपे अगोदर खरेदी करुन लागवड करतील. बांबू लागवडीच्या तपासणीनंतर बांबू रोपांचे किंमतीपैकी शासनाकडून ४ हेक्टर किंवा त्याखालील शेती असलेल्या भूधारकांना ८० टक्के तर ४ हेक्टरपेक्षा अधिक शेती असलेल्या भूधारकांना ५० टक्के सवलतीच्या दराने सबसिडी त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येईल. तसेच उर्वरित बांबू रोपांची किंमत अनुक्रमे २० व ५० टक्के प्रमाणे खर्च हा शेतकऱ्यांनी स्वत: करावयाचा आहे.

### लाभार्थ्यांची निवड:

लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहे,

- शेतकऱ्यांनी सवलतीच्या दराने बांबू रोपे मिळण्यासाठी महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने विहीत केलेल्या नमुन्यात खालील दस्तावेजासह अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

१) शेतीचा गाव नमूना ७/१२, गाव नमूना आठ, गाव नकाशाची प्रत.

२) ग्राम पंचायत / नगरपरिषद / नगरपंचायत यांचेकडून रहिवासी असल्याबाबतचा दाखला.

३) बांबू लागवड करावयाच्या शेतामध्ये बांबूचे अपेक्षित उत्पन्न मिळण्यासाठी ठिबक सिंचन व बांबू रोपे लहान असतांना ड्कारापासून रोपे सुरक्षित ठेवण्यासाठी संरक्षक कुंपणाची सोय असल्याबाबतचे हमीपत्र.

४) आधार कार्डची प्रत.

५) बँक खात्याचा तपशील व पासबुकची प्रत / कोऱ्या धनादेशाची छायांकित प्रत.

६) अर्जदार शेतकऱ्याने त्याचे बँकेचे खाते आधार क्रमांकाशी जोडून घेणे आवश्यक राहील आणि त्याकरीता त्याने बँकेला दिलेल्या पत्राची व बँकेकडून मिळालेल्या पोहोच पावतीची प्रत.

७) शेतामध्ये विहीर/शेततळे/बोअरवेल असल्याबाबतचे विहीत प्रपत्रात हमीपत्र.

८) बांबू रोपांची निगा राखणे व संरक्षण करण्यासंदर्भात विहीत प्रपत्रात हमीपत्र/बंधपत्र.

९) जिओ टॅग / जीआयएसद्वारे फोटो पाठविण्याबाबत हमीपत्र.

१०) ज्या शेतजमिनीवर तसेच शेताच्या बांधावर बांबू लागवड करावयाची आहे ते क्षेत्र नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविणे.

• महाराष्ट्र बांबू विकास मंडळामार्फत बांबू लागवड करण्याकरिता वृत्तपत्रात व्यापक प्रसिध्दी देऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येणार आहे. जे शेतकरी ऑनलाईन अर्ज सादर करु शकणार नाहीत, ते त्यांचे क्षेत्रातील संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यांचे कार्यालयात लेखी अर्ज सादर करु शकतील. शेतकऱ्यांची निवड करताना लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास "सोडत" पध्दतीने अर्जदारांची निवड करण्यात येईल. अटी पूर्ण न झाल्यास, अर्ज नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांना राहील.

### अंमलबजावणीची पध्दत:

बांबू लागवडीचे काम हे महाराष्ट्र बांबू विकास मंडळ व वन विभागाच्या सहभागाने पूर्ण करण्यात येईल. प्रथम शेतकऱ्यांनी महाराष्ट्र बांबू विकास मंडळ व वन विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने प्रमाणित केलेल्या रोपवाटिकेतून बांबू रोपे खरेदी करुन त्याची लागवड करावी.

टिश्यू कल्चर रोपे लागवड ही प्रती हेक्टरी ५०० रोपे अधिक २० % मरअळी याप्रमाणे १०० रोपे असे एकूण ६०० रोपे प्रती हेक्टरी करावयाची आहे. ४ हेक्टर पेक्षा कमी शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टरकरिता बांबू रोपे ८० % सवलतीच्या दराने तसेच ४ हेक्टर पेक्षा अधिक शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टरकरिता बांबू रोपे ५० % सवलतीच्या दराने अनुज्ञेय राहील. सदर लागवडीची महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडून पाहणी करुन ती प्रमाणित केल्यानंतर शासनाकडून प्राप्त अर्थसहाय्य, त्यांचे बँक खाते / पोस्टाचे बचत खात्यामध्ये थेट जमा करण्यात येईल. उर्वरित बांबू रोपांची किंमत अनुक्रमे २० % व ५०% ही शेतकऱ्यांनी स्वत: खर्च करावयाची आहे.

शेतजमिनीतील मातीचा पोत, सिंचनाची सोय, जवळची बाजारपेठ, स्थानिक पातळीवरील बांबूची असलेली मागणी इत्यादी बाबी विचारात घेऊन बांबू प्रजातींच्या लागवडीबाबत तज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल. शेतीमध्ये बांबू लागवडीनंतर त्याची निगा राखणे, संरक्षण, पाण्याची मात्रा, खते, किटकनाशकाची फवारणी, आंतरपीक इत्यादीबाबत महाराष्ट्र बांबू विकास मंडळाकडून नियुक्त केलेले सल्लागार, तज्ञ व वन विभागाचे स्थानिक क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांचेकडून तांत्रिक मार्गदर्शन केले जाईल. तसेच वन विभागाच्या "१९२६-हॅलो फारेस्ट" या कॉल सेंटरवर देखील या अनुषंगाने मार्गदर्शन आणि मदत मिळेल.

लाभार्थी शेतकऱ्यांनी बांबू रोपांची खरेदी महाराष्ट्र बांबू विकास मंडळाने प्रमाणित केलेल्या रोपवाटिकेतून करावी. लाभार्थी शेतकऱ्यांनी बांबू रोपांची खरेदी केल्यानंतर देयकाची प्रत संबंधीत रोपवाटिकेकडून दोन प्रतीत घ्यावी व त्यापैकी एका देयकाची स्वयं साक्षांकित प्रत महाराष्ट्र बांबू विकास मंडळ अथवा वन विभागाच्या संबधित अधिकाऱ्याकडे/कार्यालयाकडे सादर करावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर अनुदानाची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण पध्दतीव्दारे (DBT) जमा करण्यात येईल.

### बांबू लागवडीचे फायदे:

• बांबू प्रजातीचे जीवनचक्र ४०-१०० वर्ष असल्याने दरवर्षी बांबू लागवड करण्याची आवश्यकता नाही.

• बांबूला कमी किंवा जास्त पाऊस झाला तरी शेतीसारखे नुकसान होत नाही. बांबूच्या बेटांमध्ये दरवर्षी ८-१० नवीन बांबू तयार होत असतात. पाणी साचलेल्या (पाणथळ) जमिनीवर, क्षारयुक्त जमिन तसेच मुरमाड जमिनीवर सुध्दा बांबूची लागवड यशस्वीरित्या होवू शकते.

• इतर पिकांच्या तुलनेत बांबूच्या शेतीवर ३०-४० टक्के कमी खर्च येतो.

• पहिल्या व दुसऱ्या वर्षीचे बांबू सोडून, तिसऱ्या वर्षानंतर बांबू काढता येत असल्यामुळे शाश्वत उत्पन्न मिळू शकते.

• बांबू लागवडीमुळे शेत जमीनीची धूप व जलसंवर्धन या दोन्ही बाबींचा सुध्दा फायदा मिळेल.

• याशिवाय बांबूच्या कोंबापासून तर पानांपर्यंत २६ मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्याची क्षमता बांबूमध्ये आहे. उदा. बांबू कोंबापासून लोणचे, भाजी, लाकूड, पडदे, फर्निचर, अगरबत्ती, कापड, उर्जा इ. यामुळे बांबूचा कच्चा माल उपलब्ध होण्याकरिता शेतकऱ्यांना शेतामध्ये मोठ्या प्रमाणावर बांबू लागवड करण्यास प्रोत्साहित करता येईल.

• तसेच बांबूपासून उत्पन्न होणाऱ्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील.

(संपर्क: +९१ ९९७५२९५८००)

★ ★ ★